<u>नियमीत दिवाणी मुकदमा नं. २३/२०२२</u> **निशाणी ५२ पुढे**

<u>सुधा निरगुडे वि. कोंडाजी निरगुडे व इतर.</u>

**<u>उलटतपास वादीतर्फे श्री. ए. पी. गंगावणे अधिवक्ता</u>**

मला न्यायालयाचे साक्षीकामी हजर राहण्याचे समन्स प्राप्त नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, वादी व प्रतिवादी यांचेदरम्यान काय वाद आहे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला न्यायालयात काय साक्ष द्यावयाची आहे त्याबाबत प्रतिवादी व त्यांचे कुटुंबियांनी माहिती दिली होती. प्रस्तुतचा दावा कोणत्या गटाबाबत आहे ते मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, दाव्यामध्ये काय मागणी केली आहे हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. ५४१ हा वादी सुधा निरगुडे यांच्या मालकीचा आहे. गट नं. ५४१ च्या चतु:सिमा मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी सुधा निरगुडे यांच्या जमिनीच्या लगतचा कब्जेदार नाही. हे म्हणणे खरे आहे की, सुधा निरगुडे यांचे नाव गट नं. ५४१ ला कसे आले हे मला सांगता येणार नाही. सरतपासात नमुद केलेला पंचनामा दि. १५.१२.२०१९ रोजी झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, मी मौजे पांगरी गावाचे तलाठी यांचे कार्यालयात जावुन सही केली. मला सही करण्यासाठी दुपारी १२.०० वाजणेचे सुमारास बोलाविले होते. हे म्हणणे खरे आहे की, तलाठी यांनी सही करण्यासाठी बोलाविले तेव्हा मी एकटाच गेलो होतो. सदरचा नि.क्र. ३९ वरील पंचनामा मी वाचुन पाहिला होता. सदरचा पंचनामा केला त्यावेळी तलाठी यांनी तयार केलेला अहवाल वाचण्यासाठी दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, मी कामगार तलाठी यांचेसोबत वाद मिळकतीवर गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, सरतपासणी प्रतिज्ञापत्र मी येण्यापुर्वी तयार केलेले होते मी आल्यानंतर केवळ त्यावर सही केली.

**<u>उलटतपास पूर्ण.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत.

माझे समक्ष,

LAXMIKANT CHANDRAKANT WADIKAR

Digitally signed by LAXMIKANT CHANDRAKANT WADIKAR
Date: 2026.04.18 12:49:37 +0530

ठिकाण— सिन्नर

दिनांक— १८.०४.२०२६

**(लक्ष्मीकांत चं. वाडीकर)**

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, सिन्नर.